# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# जमिला मुलाणींचा 'कोयनारत्न'ने गौरव

पाटण, ता. २३ : कऱ्हाड पंचायत समितीतील शिक्षण विस्तार अधिकारी जमिला उस्मान मुलाणी यांना कोयना एज्युकेशन सोसायटी व येथील माजी विद्यार्थी संघातर्फे कोयनारत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.

येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक उस्मान मुलाणी, माजी मुख्याध्यापिका मदिना मुलाणी, प्राचार्य डॉ. शिरीषकुमार पवार, डॉ. हेमलता काटे, प्रा. डॉ. विलासराव कळंत्रे, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे, संघाचे अध्यक्ष ॲड. बाबूराव शेळके आदी उपस्थित होते.



**पाटण :** जमिला मुलाणी यांना कोयनारत्न पुरस्कार देताना ॲड. बाबूराव शेळके. त्या वेळी डॉ. शिरीषकुमार पवार, डॉ. हेमलता काटे, प्रा. डॉ. विलासराव कळंत्रे, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे आदी.

सत्कारास उत्तर देताना मुलाणी म्हणाल्या, आई- वडिलांचे संस्कार व शाळेने दिलेली ज्ञानाची शिदोरी यामुळेच जीवनात उत्तुंग यश प्राप्त करता आले. शाळेच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहीन. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.